**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०१७**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : शोकप्रस्ताव.**

"श्री.अंबादास बापुरावजी साबळे, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव."

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **विधी व न्याय विभागाचा** सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(२) **पर्यावरण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **पर्यावरण विभागाचा** सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(३) **ऊर्जा मंत्री** : (क) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्‍चितीकरणाच्या अटी व शर्ती) (पहिली सुधारणा) विनियम, २०१७ प्रसिध्द करणारी

अधिसूचना क्रमांक मविनिआ / लिगल / २०१७ / ०१२८९ दिनांकित ४ जानेवारी, २०१७ सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि.च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवाविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) (पहिली सुधारणा) विनियम, २०१७ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ / तांत्रिक / परवाना अटी / जीईपीएल / २०१७ / १४२५, दिनांकित ३ फेब्रुवारी, २०१७ सभागृहासमोर ठेवतील.

(४) **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा** सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**चार : सभागृह नेते यांचा प्रस्ताव —**

भारताच्या माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीय श्रीमती इंदिराजी गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त, सन्माननीय पद्मविभूषण श्री.शरदचंद्रजी पवार, खासदार, माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री यांच्या संसदीय कारकिर्दीस ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तसेच महाराष्ट्र विधानसभेचे जेष्ठ सन्माननीय सदस्य, माजी मंत्री व माजी विरोधी पक्ष नेते श्री.गणपतराव देशमुख यांच्या संसदीय कारकिर्दीला ५५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्या कार्याचा गौरव करण्याबद्दलच्या प्रस्तावावर चर्चा.

**पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

(१) **डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. नितेश राणे, शरद सोनावणे, कालीदास कोळंबकर, सरदार तारासिंह, अमीन पटेल, राधाकृष्ण विखे-पाटील, पृथ्वीराज चव्हाण, अस्लम शेख, मो. आरिफ (नसीम) खान, प्रा. वर्षा गायकवाड, डॉ. संतोष टारफे, श्री. बाळासाहेब थोरात, डॉ. पतंगराव कदम, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. सुनिल केदार, विजय औटी, सुनिल प्रभु, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, हसन मुश्रीफ, राजन साळवी, संजय पोतनीस, अजय चौधरी, अजित पवार, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. राणाजगजीतसिंह पाटील, अबु आझमी, संतोष दानवे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"चेंबूर (मुंबई) येथील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणा-या संत एकनाथ मुलांच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या आहारात पाल सापडल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास येणे, वसतिगृहात पुरविण्यात येणा-या जेवणात यापूर्वीही काचेचे तुकडे व गोगलगाय आढळल्यामुळे वसतिगृहातील १५० विद्यार्थ्यांनी वसतिगृह अधीक्षकांकडे अन्न धान्याचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द तक्रारी करुनही संबंधितांनी कोणतीच दखल न घेणे, सामाजिक न्याय विभागाद्वारे कंत्राटदारांना आलटून पालटून कंत्राटे देण्यात येत असल्याचा गंभीर आरोप चेंबूर येथील विद्यार्थ्यांनी करणे, झुरळ, उंदराच्या लेंड्या, काचेचे तुकडे व खडे जेवणात सापडत असल्याने विद्यार्थ्यांनी शासनाकडे तक्रार करुनही कंत्राटदाराविरुध्द कोणतीच कारवाई न होणे, अजूनही वसतिगृहांना भेसळयुक्त अन्नधान्याचा पुरवठा होणे, परिणामी वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २)**

(२) **सर्वश्री. अजय चौधरी, विजय औटी, सुनिल शिंदे, सुनिल प्रभू, राजन साळवी, ॲड. भीमराव धोंडे, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण शहराच्या वेगवेगळया भागात दिनांक ३० डिसेंबर, २०१६ ते ८ जानेवारी, २०१७ या कालावधीत अवैध तस्करीसाठी ३७ सोफासेटमध्ये कोट्यवधी रुपये किंमतीचे सुमारे १४ टन रक्तचंदन लपविण्यात आल्याचे

निदर्शनास येणे, त्यासाठी शहराजवळील मिरजोळी गावच्या हद्दीत पत्र्याची शेड उभारून रक्तचंदन लपवून सोफासेट बनविण्याचा सुरु असलेला कारखाना, हा कारखाना गत काही वर्षांपासून सुरू असल्याने अन्य राज्यांतून वाहनांमधून एवढया मोठया प्रमाणात रक्तचंदन आणले जात असताना एकदाही कारवाई न झाल्याने तपासणी नाक्यांवर होणाऱ्या तपासणीबाबत निर्माण झालेली शंका, दक्षिणेकडील राज्यातून आणण्यात आलेले रक्तचंदन स्थानिकांच्या माध्यमातून समुद्र मार्गे परदेशात पाठविण्यात येणार असल्याचा व्यक्त होत असलेला संशय, मुख्य सुत्रधाराचे नाव समजूनही वन विभाग तसेच पोलीस तपास यंत्रणांना त्याचा शोध न लागणे, तसेच उरण, जि.रायगड येथील जेएनपीटी बंदरातील जेडब्ल्युआर कंटेनर गोदामात बेकायदा रक्तचंदनाचा साठा मुलतानी माती असल्याच्या बनावाखाली लपविण्यात येणे, कोट्यवधी रुपये किंमतीच्या रक्तचंदनाची राजरोसपणे तस्करी होत असतांनाही पोलीस व डीआरए विभागाला रक्तचंदनाच्या तस्करीतील आरोपींना पकडण्यात येत असलेले अपयश, नागरिकांमध्ये तस्कर, वन अधिकारी व पोलीस यांचे आर्थिक संगनमत असल्याचा वाढता संशय, असे असतानाही या तस्करी प्रकरणाचा तपास अचानक थांबविण्यात आल्याने गुन्हेगारांना शासनाने अभय दिल्याची निर्माण झालेली भावना, अवैध रक्तचंदनाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द तात्काळ कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **श्री. प्रकाश आबिटकर, ॲड. भीमराव धोंडे, श्री. सुनिल शिंदे, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर, सांगली व सावंतवाडी या ३ संस्थानामधील ३ हजार देवस्थानाच्या नियंत्रणासाठी शासनाने पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीची केलेली स्थापना, देवस्थानांच्या अखत्यारितील अंदाजे ३५ हजार एकर जमिन व साडेतीन शक्तीपिठांपैकी एक असलेल्या कोल्हापूर येथील सुप्रसिध्द महालक्ष्मी मंदिर (अंबाबाई) देवस्थान या सर्वांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम ही समिती वर्षानुवर्षे करीत असणे, या मंदिराच्या कामकाजाचे नियोजन हे धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांचेकडे नोंदणी केलेल्या सार्वजनिक विश्वस्त कायद्याप्रमाणे सुरु असून शासनाचे पूर्ण नियंत्रण नसल्याने अनेक वर्षे या देवस्थान समितीचे लेखापरिक्षण झालेले नसणे, हजारो एकर जमिनीचा खंड वसूल न होणे, १०० एकरहून अधिक जमिनीची बेकायदेशीर विक्री देवस्थान समितीने केली असून ज्या उद्देशासाठी जमिनीची विक्री केली आहे तो उद्देशच सफल न होणे, देवस्थान समितीच्या अखत्यारित असणा-या जमिनी सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने व भविष्यामध्ये जमिनीचे योग्य नियोजन करण्यासाठी शिर्डी संस्थान, पंढरपूर देवस्थानच्या धर्तीवर पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीसाठी स्वतंत्र कायदा तयार करण्याची आवश्यकता, देवस्थान समितीच्या वतीने विक्री करण्यात आलेल्या व उद्दीष्ट साध्य झाले नाही अशा जमिनी शासनाने ताब्यात घेऊन देवस्थान समितीच्या कामकाजाची सीआयडी मार्फत तपास करुन

बेकायदेशीर व नियमबाहय काम करणाऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(४) **सर्वश्री. अमीन पटेल, अतुल भातखळकर, अमीत साटम, राधाकृष्ण विखे-पाटील, पृथ्वीराज चव्हाण, अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. कालीदास कोळंबकर, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. मो. आरिफ (नसीम) खान, सुनिल केदार, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावित, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. पतंगराव कदम, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री सुनिल प्रभू, अमित देशमुख, ॲड. राहुल कुल, श्री. अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"वायुप्रदूषणाने घातक पातळी गाठलेल्या देशातील ९४ शहरांत राज्यातील मुंबई, नवी मुंबई, उल्हासनगर, बदलापूर, पुणे, नागपूर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, चंद्रपूर, जळगाव, जालना, सांगली, कोल्हापूर, लातूर, नाशिक आणि सोलापूर या १७ शहरांचा समावेश असून महाराष्ट्र राज्य प्रदुषणात अव्वल क्रमांक असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियत्रंण मंडळाने माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये केलेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास येणे, राज्यातील सतरा शहरांमधील हवेमध्ये पार्टिक्युलेट मॅटर (पीएम१०) या प्रदुषित घटकांचे प्रमाण निश्‍चित पातळीपेक्षा अधिक असल्याचे आढळून येणे, मुंबईचा वायू प्रदूषणाचा निर्देशांक सुमारे ३१० या अत्यंत धोकादायक पातळीवर पोहोचणे, याशिवाय पुणे, बदलापूर आणि उल्हासनगर या शहरांमध्ये पीएम १० बरोबरच नायट्रोजन डायऑक्साइड आदी प्रदुषक घटकाची पातळी प्रमाणापेक्षा अधिक असल्याचेही निदर्शनास येणे, या शहरातील हवा प्रदुषित झाल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, प्रदुषण रोखण्यासाठी कोटयवधी रुपयांच्या निधीची तरतूद करुनही राज्यातील वाढत्या प्रदुषणाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने शहरांतील वाढते प्रदुषण रोखण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).**

**आठ : सन २०१७-२०१८ चा लेखानुदान प्रस्ताव.**

**नऊ : शासकीय विधेयक :**

**पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०१७.

दहा : **सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा. विरेंद जगताप, श्री. जयदत्त क्षीरसागर, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. अबु आझमी, अमिन पटेल, सुनिल केदार, दिलीप सोपल, गोपालदास अग्रवाल, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. सतिश पाटील, मो.आरिफ नसीम खान, सर्वश्री. डी. एस अहिरे, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, मधुकरराव चव्हाण, शिवेंद्रसिंह भोसले, कालिदास कोळंबकर, राजेश टोपे, बसवराज पाटील, वसंतराव चव्हाण, रणजित कांबळे, नितेश राणे, हनुमंत डोळस, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री. काशिराम पावरा, विजय भांबळे, अस्लम शेख, श्रीमती निर्मला गावित, डॉ. संतोष टारफे, श्री. शेख आसिफ शेख रशिद, कु. प्रणिती शिंदे, श्री. त्र्यंबक भिसे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील आरोग्य व्यवस्थेचा उडालेला बोजवारा, पुरेशा वैद्यकीय उपचाराअभावी रुग्णांना तसेच अपघातग्रस्तांना प्राण गमवावे लागणे, आरोग्य विभागातील कर्मचारी, डॉक्टर्स यांची अपुरी संख्या, डॉक्टरांना रुग्णांच्या नातेवाईकांकडून सतत होत असलेली मारहाण, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या विविध योजना निधी अभावी बंद पडणे, परिणामी आदिवासी भागात दिवसेंदिवस बालमृत्यूमध्ये होत असलेली वाढ, राज्यातील १६ आदिवासीबहूल विशेषत: ठाणे व पालघर जिल्ह्यात बालमृत्यूच्या प्रमाणात गेल्या वर्षापेक्षा दुप्पटीने झालेली वाढ, प्रसुती दरम्यान मातांचा होणारा मृत्यू, एकात्मिक बाल विकास (ICDS) योजनेच्या अमलबजावणीसाठी अर्थसंकल्पात केलेली अपुरी तरतूद, परिणामी निधी अभावी व्हिलेज चाईल्ड डेव्हलपमेंट सेंटर व चाईल्ड ट्रिटमेंट सेंटर ही केंद्र शासनाची योजना निधी अभावी बंद होणे, पोषण आहारासाठी दिला जाणारा अपुरा भत्ता, नित्कृष्ट पाकिट बंद आहार, आदिवासी भागातील वाहतुकीची अपुरी साधने, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य, अन्न व नागरी पुरवठा आणि आदिवासी विकास या विभागांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने या भागात वैद्यकीय सुविधा न मिळणे, रोजगाराच्या संधी नसल्यामुळे होणारे स्थलांतर, गेल्या वर्षभरात राज्यात हजारो आदिवासी बालकांचा केवळ कुपोषणाने मृत्यू झाल्याचे शासनाने मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणणे, आयुर्वेदिक डॉक्टरांच्या समस्येकडे होणारे दुर्लक्ष, कुष्ठरोग्यांचे वाढते प्रमाण, बनावट डॉक्टरांचा सुळसुळाट, अवयवदानातील घोटाळे, रुग्णालयांची अस्वच्छता, खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्ण हक्कांचे होणारे उल्लंघन, राज्यातील बालसुधारगृहांची दयनीय अवस्था, मानखुर्दच्या चिल्ड्रेन एड सोसायटीच्या बालगृहामध्ये ६ मुलांचा झालेला मृत्यू, मतीमंद मुलांची होणारी फरफट, अत्याचार पिडीत महिला व मुलींना अर्थसहाय्य देण्यासाठी राज्याच्या महिला व बालविकास विभागाने सुरु केलेल्या मनोधैर्य योजनेस निधीचा अपुरा पुरवठा, अंगणवाडी सेविकांच्या व मदतनीसांच्या मागणीकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, आधार आश्रमात केवळ निराधारांनाच सांभाळण्याचे बालकल्याण आयुक्तांचे आदेश, आश्रमशाळांतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराची अनास्था, पंतप्रधान योजनांपासून ग्रामीण आदिवासी वंचित असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अकरा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७.

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**बारा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु चर्चा न झाल्यामुळे पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्र. १ व २)**

(१) **श्री. अजय चौधरी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

" महाराष्ट्र गृहनिर्माण प्राधिकरणाच्या अंतर्गत मुंबई शहर व उपनगरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांची जिवीत व वित्त हानी टाळण्यासाठी म्हाडाच्या ३३ (७) अधिनियमान्वये अनेक इमारतींचा पुनर्विकास प्रलंबित असणे, सदर इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी विकासकाने ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन सुमारे ८ ते १० वर्षांचा कालावधी होऊनही इमारतींच्या पुनर्विकासाचे काम प्रलंबित असणे, इमारतीमधील रहिवाशांची पर्यायी व्यवस्था संक्रमण शिबीरात न करता अन्य ठिकाणी सोय करुन त्याचे भाडे रहिवाशांना देण्यात न येणे, परिणामी रहिवाशांमध्ये

पसरलेला असंतोष, त्यामुळे शासनाने जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुर्नविकासाची कामे तसेच झोपडपट्टी पुर्नविकास योजनेतील कामे मुदतीत पुर्ण न करणाऱ्या विकासकांवर कारवाई करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या नियम ३३(७) व ३३(१०) यामध्ये बदल करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **श्री.नरेंद्र पवार, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"अंबरनाथ (जि. ठाणे) येथील वालधुनी नदीच्या पात्रातील बेकायदेशीर अतिक्रमणामुळे दिनांक २६ जुलै, २००५ रोजी आलेल्या पुरामुळे पाण्याचा निचरा न होणे, तसेच स्थानिक कारखान्यातील रसायन मिश्रीत पाणी नदी पात्रात सोडल्यामुळे असे पाणी परिसरातील नागरीकांच्या घरामध्ये शिरणे, याबाबत स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आणि प्रदुषण नियंत्रक मंडळाकडे नागरिकांनी तक्रार करुनही त्यांनी कोणतीच कार्यवाही न केल्याने नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु चर्चा न झाल्यामुळे पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्र. ३ व ४)**

(३) **डॉ.देवराव होळी, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"गडचिरोली जिल्हा हा ७०% वन व्याप्त जिल्हा असून जंगलामध्ये, तेंदू, बांबू, मोहफुल, हिरडा, बेहळा, आवळा, इत्यादी प्रकारचे गौण वनोपज मोठ्या प्रमाणावर असणे, या जिल्ह्यात एकही मोठा उद्योग निर्माण न झाल्याने येथे गौण वनोपजावर आधारित उद्योग निर्माण झाल्यास स्थानिक आदिवासी, गैर आदिवासी व तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे, येथील वनात मोठया प्रमाणावर वनौषधी असूनही त्या आधारित उद्योग नसणे, सबब गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी गौण वनोपजावर आधारित उद्योग निर्माण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"सिन्नर तालुक्यातील गोदावरी उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्यादित बारागाव पिंप्री, पाटपिंप्री, सुळेवाडी योजना सन १९८३ साली स्थापन होणे, सदर योजना ३ वर्षात पूर्ण होणे अपेक्षित असताना वितरण व्यवस्थेची कामे अद्यापही अपूर्ण असल्याने उक्त तीनही गावांतील शेतीला एकदाही पाणी पुरवठा न होणे, योजना प्रलंबित राहिल्याने शेतकऱ्यांवरील कर्ज ९ कोटी रुपयांवरून ३७ कोटी रुपयांवर पोहोचणे, सदर कर्जामुळे नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक देखील अडचणीत येणे, सन २००९ साली विभागीय कार्यालय, नाशिक येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जळगाव जिल्ह्यातील २१ आणि धुळे जिल्ह्यातील ३५ संस्थांना कर्जमाफी देणे, तथापि, नाशिक जिल्ह्यातील खास करून सिन्नर तालुक्यातील उक्त योजनेस शेतकऱ्यांची मागणी असून देखील कर्जमाफी न मिळणे, शेतकऱ्यांना एकदाही पाणी पुरवठा न झाल्याने तसेच थकीत कर्ज दिवसागणिक वाढत असल्याने बाधित शेतकऱ्यांचे होणारे हाल, त्रास व आत्महत्या टाळण्यासाठी या संपूर्ण कर्जाला कर्ज माफी देण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०१७ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. ५ व ६)**

(५) **श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"चासकमान धरणासाठी शेतकऱ्यांची जमिन संपादीत करुन अनेक वर्षांचा कालावधी होऊनही शेतकऱ्यांचे अद्यापही पुनर्वसन करण्यात न येणे, प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे तातडीने पुनर्वसन करुन त्यांना पर्यायी शेत जमीन देण्याबाबत शासनाकडे वारंवार मागणी करुनही त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

(६) **श्री. संजय सावकारे, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"महाराष्ट्र पोलीस दलाची स्थापना झाल्यापासून मुंबई वगळता राज्यातील इतर कोणत्याही ठिकाणच्या शस्त्रशाखांमध्ये शस्त्रतज्ज्ञ पदे रिक्त असल्याने तात्पुरत्या तज्ज्ञांकडून लाखो शस्त्रे प्रमाणित करण्यात येणे, परिणामी शस्त्र हाताळतांना पोलीस दलात अपघात होणे, शस्त्रतज्ज्ञांची तातडीने नियुक्ती करुन ९० टक्के मुदतबाह्य शस्त्रे वापरातून बाहेर काढण्याबाबत होत असलेली दिरंगाई, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) (सूचना क्र. ७)**

(७) **श्री. राहूल कुल, वि.स.स.**

"**पुणे महानगरपालिकेच्यावतीने पाणी शुध्द करुन कालव्यात सोडण्याबाबत**" या विषयावरील श्री.बाबुराव पाचर्णे, वि.स.स. यांचा दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्र. २४७ मधील प्रश्न क्रमांक ४२८४५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २२ मार्च, २०१७

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.